# TERRAFORM MAGNUM LIMITED

**Corporate Identity Number: L65990MH1982PLC040684**

**Regd. Off.: Godrej Coliseum, A- Wing 1301, 13th Floor, Behind Everard Nagar, Off Eastern Express Highway, Sion (East), Mumbai -400 022 T: + 91 (22) 62704900**
**Web: www.terraformmagnum.com E-mail: secretarial@terraformrealty.com**

---

**February 06, 2024**

**To,**
**The Manager,**
**Corporate Service Department**
**BSE Limited P.J. Towers, Dalal Street,**
**Mumbai- 400 001**

**Scrip Code: 506162**

**Subject: Intimation of newspaper publication pursuant to Regulation 47 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulation, 2015**

Pursuant to Regulation 47 of the Listing Regulations, please find enclosed copies of extract of Un-Audited Financial Results of the Company for the Third Quarter ended December 31, 2023 published on 06.02.2024 in Navshakti (Marathi) newspaper and Free Press Journal (English) newspaper.

We request you to take the above information on record.

Thanking You

Yours Faithfully,
**FOR TERRAFORM MAGNUM LIMITED**

Bhanushali

**Ms. Urmi Bhanushali**
**Company Secretary**

Terraform Magnum Limited Mumbai

**Encl.: As above**

निवडक महानगर

## मदत म्हणून कार देणे पडले महागात

**नवी मुंबई** : नवी मुंबईतील एका व्यक्तीला परिचित माणसाला अडचण असल्याने कार देणे चांगलेच महाग पडले आहे. जूनमध्ये दिलेली कार अद्याप परत केली नाहीच, आता तर परत देणार नाही, असे स्पष्ट सांगितल्याने शेवटी त्या व्यक्तीच्या विरोधात पोलीस गुन्हा नोंद करण्यात आला आहे. रशीद कुरेशी (राहणार मुंब्रा) असे यातील आरोपीचे नाव आहे. आरोपी रशीद आणि यातील फिर्यादी मोहम्मद शौकत (राहणार एपीएमसी, तुर्भे) यांची चांगली मैत्री होती. दोघेही मटण व्यवसाय करत होते. या व्यवसायामुळेच दहा वर्षांपूर्वी दोघांची ओळख झाली आणि नंतर चांगली मैत्री जमली. जून २०२३ मध्ये रशीद यांनी घरात लग्नकार्य असून, गाडीची गरज असल्याचे सांगत मोहम्मद यांच्या मुलाकडून कार घेऊन गेले; मात्र घरातील लग्नकार्य उरकले तरीही गाडी दिलीच नाही. वारंवार कार मागितली तरीही दिली नाही. ४ ऑक्टोबरला रशीद याने मुंब्रा येथे मोहम्मद यांना कार घेऊन जाण्यासाठी बोलावले; मात्र कार न देता मारहाण करून परत पाठवले. शेवटी याबाबत एपीएमसी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यावर त्याची शहानिशा करून रशीद याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कळव्यात शॉर्टसर्किटमुळे ब्युटी पार्लरमध्ये आग

**ठाणे** : कळवा येथे एका ब्युटी पार्लरमध्ये शॉटसर्किट होऊन आग लागल्याची घटना सोमवारी पहाटे समोर आली. या घटनेत सुदैवाने कोणालाही दुखापत झाली नाही. सोमवारी पहाटे श्रीदीप सोसायटी, मनीषा नगर गेट क्रमांकः-३, कळवा येथील तळमजल्यावर असलेल्या रंगरूप ब्युटी पार्लर येथे ही आग लागली. आगीची माहिती मिळताच घटनास्थळी टोरंट पॉवरचे कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापन पथक, अग्निशमन दलाचे जवान एक रेस्क्यु वाहन व एक फायर वाहनासह उपस्थित झाले. त्यानंतर काही वेळेतच आगीवर नियंत्रण मिळवण्यात अग्निशमन दलाच्या जवानांना यश आले. आग लागलेल्या ब्युटी पार्लरमधील वॉशिंग मशीन, ए.सी. युनिट व इलेक्ट्रिक वायरिंग जळाल्याने नुकसान झाल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षातून देण्यात आली.

## दिवसा एकाच वेळी दोन घरांत चोरी

**नवी मुंबई** : नवी मुंबईतील वाशी येथे काही तासांच्या अंतराने दोन घरफोडीच्या घटना समोर आल्या आहेत. या दोन्ही मिळून ३ लाख ९६ हजार ७०० रुपयांचा ऐवज चोरी झाला आहे. दोन जवळजवळ असणाऱ्या इमारतीतील दोन सदनिकांत ही घटना घडली आहे. या प्रकरणी रविवारी वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. वाशी सेक्टर १६ येथे राहणारे संजय रामाकृष्णन हे रविवारी कुटुंबीयांसमवेत उल्वा येथे भावाच्या मुलीचा वाढदिवस साजरा करण्यासाठी गेले होते. घरी येऊन पाहिल्यावर घरातील सर्व सामान अस्ताव्यस्त पडले होते. शिवाय कपाटातील सोन्याची साखळी लहान साखळी लॉकेट असा सर्व ३ लाख ६८ हजार सातशे रुपयांची चोरी झाली होती. संजय हे ज्या इमारतीतील सदनिकेत राहत होते त्याच्या शेजारी असणाऱ्या इमारतीत राहणारे सचिन निमगरे यांच्याही घरात चोरी झाली होती. त्यांच्या घरातील २० हजार रुपयांची सोनसाखळी आणि ८ हजार रुपयांचा कॅमेरा चोरी झाला होता, असे दोघांच्या घरातील मिळून ३ लाख ९६ हजार ७०० रुपयांचा ऐवज चोरी झाला आहे. दोन्ही घरांत चोरी करणारे एकाच असावेत, असा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला असून, संजय आणि सचिन यांची एकत्रित तक्रार दाखल झाल्यावर अनोळखी व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# परिवहन बससेवेची दरवाढ नाही?

## थकबाकीसाठी मात्र शासनाच्या अनुदानावर ठाणे पालिका परिवहनची मदार

**ठाणे** : तिकीट दरामध्ये कोणत्याही प्रकारची दरवाढ न करता यावर्षीही ठाणेकर प्रवाशांवर तिकीट दरवाढीची कुऱ्हाड टाकणार नसल्याचा निर्णय परिवहन प्रशासनाकडून घेण्यात आला असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे; मात्र परिवहनच्या कर्मचाऱ्यांची थकबाकी देण्यासाठी केवळ ठाणे महापालिकेच्या अनुदानावर अवलंबून न राहता यावर्षी शासनाकडूनही अनुदानाची मागणी करण्यात आली आहे. शासनाकडून जास्तीत जास्त अनुदान पदरात पाडून घेण्यासाठी परिवहन प्रशासन प्रयत्नशील असून, यासाठी शासनाकडे पत्रव्यवहार देखील करण्यात आला असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या आठवड्यात परिवहन सेवेचा अर्थसंकल्प सादर होण्याची शक्यता कोणतीही नवी योजना जाहीर न करता जुन्याच योजनांचा समावेश यंदाच्या अर्थसंकल्पात करण्यात आला असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

ठाणे परिवहनसेवेने २०२३-२४ चा ४८७.६८ कोटी रकमेचा मूळ अर्थसंकल्प सादर केला होता. गेल्या वर्षीही परिवहनच्या तिकीट दरात कोणत्याही प्रकारची दरवाढ केली नव्हती. यावर्षीही हा निर्णय कायम ठेवत कोणत्याही प्रकारची दरवाढ करण्यात येणार नसल्याचा निर्णय घेण्यात आला आहे. गेल्या वर्षी अनुदानापोटी ५५० कोटी रकमेची मागणी ठाणे महापालिकेकडे करण्यात आली होती. तर ठाणे महापालिकेकडून मात्र २३० कोटी मंजूर करण्यात आले होते. कोरोना काळात परिवहन उपक्रमाची बससेवा ठप्प असल्यामुळे या उपक्रमाच्या उत्पन्न वसुलीवर मोठा परिणाम झाला होता. परिवहनच्या ताफ्यातील ८२ पेक्षा अधिक कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली आहे. तर वाढीव महागाई भत्ता, सहावा वेतन आयोग, सातवा वेतन आयोग आदींचा बोजा देखील परिवहनवर पडला आहे.



**पालिकेची आर्थिक परिस्थिती बेताची** : सध्या ठाणे महापालिकेची आर्थिक परिस्थितीही बेताची आहे. ठाणे महापालिकेचेही कारभार सध्या शासनाच्या अनुदानावरच सुरूच आहे. त्यामुळे यावर्षी अनुदानासाठी केवळ ठाणे महापालिकेवर अवलंबून न राहता शासनाच्या माध्यमातून जेवढे अनुदान परिवहनच्या पदरात पाडून घेता येईल यासाठी परिवहन प्रशासन प्रयत्नशील आहे. यासाठी आठ दिवसांपूर्वीच शासनासोबत पत्रव्यवहार करण्यात आला असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. परिवहन प्रशासनाकडे एकूण १७० कोटींची थकबाकी असून यामध्ये सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनामधील फरक देण्यासही मान्यता मिळालेली नाही. सहाव्या वेतन आयोगापोटी ५२ कोटी, सातव्या वेतन आयोगापोटी ७० कोटी, तर इतर महागाई भत्ता, शिक्षण, अशा विविध भत्त्यांचीही थकबाकी असून, ही सर्व थकबाकी देण्यासाठी आता शासनाच्या अनुदानावरच परिवहन प्रशासनाची मदार आहे.

# वर्षभरात ५४० कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया

## पुरुषांचा प्रतिसाद अल्प

**जव्हार** : पालघर जिल्ह्यातील ग्रामीण भाग म्हणून ओळखला जाणारा जव्हार तालुका शिक्षण, आरोग्य विभाग तथा केंद्र व राज्य शासनाच्या लोककल्याणकारी योजनांमुळे विकसित होत आहे. लहान कुटुंब, सुखी कुटुंब या ब्रीद वाक्याचा बोध घेत येथील नागरिकांनी कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेला प्राधान्य दिले आहे, गेल्या वर्षभरात कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेचे एकूण उद्दिष्ट ४८५ असताना ते तालुका आरोग्य विभागाने सहज पूर्ण करून त्यापेक्षा अधिक म्हणजे ५४० शस्त्रक्रिया यशस्वीपणे केल्या आहेत. यापैकी स्त्री शस्त्रक्रिया ५२१ करण्यात आल्या असून, त्या तुलनेत पुरुष शस्त्रक्रिया १९ असल्याने पुरुषांच्या सहभागाचे अल्प प्रमाण आहे; मात्र ग्रामीण भागात पुरुष देखील कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यासाठी हळूहळू का होईना पुढाकार घेत असल्याची माहिती तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयातून देण्यात आली.

लोकसंख्या नियंत्रणासाठी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया उपयुक्त ठरते. त्यामुळेच आरोग्य विभागाकडून 'हम दो हमारे दो'चा जागर करीत कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेचे महत्त्व नागरिकांना पटवून दिले जाते. मात्र या शस्त्रक्रियेसाठी पुरुषांमध्ये भीतीचे वातावरण असून, तालुक्यात गेल्या वर्षभरात महिलांच्या तुलनेत केवळ १९ पुरुषांनी शस्त्रक्रिया केली आहे, यावरून कुटुंब नियोजनाच्या शस्त्रक्रियेत महिलाच पुढे असल्याचे दिसून येते.



> कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेमुळे पुरुषाच्या शरीरावर कुठलेही विपरीत परिणाम होत नाही. याबाबत नेहमीच जनजागृती करण्यात येते. मात्र असे असले, तरी मागील वर्षभरात पुरुषांनी कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेला पाठ दाखवली आहे. पुरुषांनी न घाबरता कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेसाठी पुढे येण्याची गरज आहे. - **डॉ. किरण पाटील**, तालुका आरोग्य अधिकारी, जव्हार

कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्याने कुठलेही विपरीत परिणाम पुरुषाच्या शरीरावर होत नसल्याचे आरोग्ययंत्रणेतील तज्ज्ञ सांगतात. शिवाय कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया वैवाहिक जीवनाचा आनंद घेणाऱ्या पुरुष किंवा महिलेला करता येते. कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेमुळे पुरुषाच्या शरीरावर कुठलेही विपरीत परिणाम होत नसल्याचे वैद्यकीय तज्ज्ञ सांगत असले तरी मागील वर्षभरात पुरुषांनी कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेला पाठ दाखवली असल्याची माहिती आरोग्य विभागाच्या आकडेवारीवरून दिसून येते.

# दालमिया लायन्स ॲडमिनोत्सव उत्साहात

**मुंबई** : लायन्स क्लब ऑफ मालाड बोरिवली कॉलेज चॅरिटी ट्रस्ट संचलित प्रहलादराय दालमिया लायन्स वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय यावर्षी शैक्षणिक क्षेत्रातील ५२ वर्ष पूर्ण करीत आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकरिता आयोजित आंतरमहाविद्यालयीन सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धा 'दालमिया लायन्स ॲडमिनोत्सव २०२४' मध्ये जल्लोषात ३० विविध महाविद्यालयातील २१५ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त पणे सहभाग घेतला. या कार्यक्रमाचा शुभारंभ प्रसिद्ध अभिनेता राजेंद्र शिसटकर (क्राईम पेट्रोल फेम), यांच्याहस्ते दीप प्रज्वलन व आकाशात फुगे सोडून करण्यात आला. ॲडमिनोत्सवाच्या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी महाविद्यालय व्यवस्थापन समितीचे माननीय विश्वस्त व सचिव लायन कन्हैयालाल घ. सराफ, विशेष पाहुणे लायन कमल रुईया, लायन अशोक बैरागरा, सहसचिव लायन विकास क. सराफ, लायन अमित अग्रवाल व पायल अग्रवाल यांनी उपस्थित राहून स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. प्राचार्य प्रो. डॉ. दिगंबर एन. गंजेवार यांनी स्वागत, मेधा सावंत यांनी पाहुण्यांचा परिचय व महिमा द्विवेदी यांनी सरस्वती वंदना सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेश दुबे व आभार प्रदर्शन भाग्यश्री कांबळे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी रित्यापार पाडण्यामध्ये पूनम पटवर्धन, सुशील यादव व राधेश्याम यादव यांची महत्त्वपूर्ण भूमिका होती.




## वाशीमध्ये दोन कार जळून खाक

**नवी मुंबई** : वाशी येथून सीवूड्स येथे जात असलेल्या फोर्ड कारने अचानक पेट घेतला. कारचालकाने तत्काळ सदर कार रस्त्याच्या बाजूला उभी करून कारमधून पळ काढल्याने तो बचावला; मात्र त्यामुळे रस्त्याच्या बाजूला पार्क असलेल्या मारुती कारनेसुद्धा पेट घेतल्याने या आगीत दोन्ही कार जळून खाक झाल्याची घटना सोमवारी सायंकाळी घडली. सुदैवाने या आगीत कुठल्याही प्रकारची जीवितहानी झाली नाही.

# माथाडी चळवळीत शिरलेल्या गुंडगिरीकडे सरकारचे दुर्लक्ष

## माथाडी नेत्यांचा आरोप

**मुंबई** : माथाडी चळवळीत शिरलेली गुंडगिरी मोडून काढण्याऐवजी त्याच्या नावाखाली कायदाच मोडीत काढण्याचा राज्य सरकारचा हेतू आहे की काय, असा सवाल आता गरीब कष्टकरी माथाडी कामगारांकडून केला जाऊ लागला आहे.

माथाडी कायदा आणि माथाडी कामगार यामुळे महाराष्ट्र विशेषतः मुंबई आणि उपनगर परिसरात व्यवसाय करणे कठीण होत असल्याच्या तक्रारी व्यापारी आणि इतर व्यावसायिकांकडून गेली काही वर्षे सातत्याने करण्यात येत आहेत. अखिल भारतीय माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनने चळवळीत शिरलेल्या गुंड प्रवृत्तींचा बिमोड करण्याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व इतर संबंधितांकडे यापूर्वी अनेक वेळा तक्रारी केल्या आहेत; मात्र सहा महिने होत आले तरी पोलिसांकडून कोणतेही कारवाई झालेली नसून त्यामुळे व्यापारी वर्गाला होणारा उपद्रव वाढला आहे.

माथाडी क्षेत्रामध्ये बळकावलेली गुंडगिरी आणि बेकायदा ठेकेदारी मोडून काढावी यासाठी अखिल भारतीय माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनने सरकार दरबारी अनेक वेळा निवेदने दिली; मात्र आश्वासन देऊनही कारवाई शून्य असल्याचे संघटनेचे सरचिटणीस अविनाश बाबुराव रामिष्टे यांनी सांगितले. परिस्थिती अशीच राहिल्यास व्यापक आंदोलन उभारण्याशिवाय माथाडी संघटनांसमोर उपाय राहणार नाही, असा इशारा अविनाश रामिष्टे यांनी दिला आहे.

**जाहीर नोटीस** वकील अंकित भंडारी
वसई येथील मा. श्री. गि. ग. कांबळे, २ रे सह दिवाणी न्यायाधिश व. स्तर, वसई हयांच्या न्यायालयात
ने. ता. २२/०२/२०२४
चौ. अ. क्र.१८/२०२४
नि.क्र. ०५
**1)**Indaram Hemaram Choudhary,B 101, Ganesh Bhuvan, Tulinj road, Near Apex Tower, Nalasopara East, Tal. Vasai, Dist. Palghar.,**2)** Miss. Suman Indaram Choudhary, **3)** Master. Dilip Indaram Choudhary, **4)** Bhumi Indaram Choudhary,Throuh Legal Gaurdian Mr. Indaram Hemaram Choudhary **5)** Master. Vikas Indaram Choudhary, Through Legal Gaurdian Mr. Indaram Hemaram Choudhary All R.o at B 101, Ganesh Bhuvan, Tulinj road, Near Apex Tower,Nalasopara east, Tal. Vasai, Dist. Palghar ..... **Applicant**
V/s
None ....**Respondent**
ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी दिनांक १९/०१/२०२४ रोजी Late. Bhavna Indaram Choudhary died on 25/07/2023 रोजी मयत झाले असुन त्यांच्या मालमत्ते संबंधी वारस दाखला (हेअरशिप प्रमाणपत्र) मिळणे साठी या न्यायालयात चौकशी अर्ज क्रमांक १८/२०२४ दाखल केला आहे.
**Schedule of Property**
**1)**Shop bearing no. 6, Meen Apt., A wing, More, Nalasopra East, Tal.Vasai., **2)**Shop bearing no.3, Meen Apt., A wing, More, Nalasopara east, Tal. Vasai. **3)**Shop bearing no. 4, Meen Apt., A wing, More, Nalasopara east, Tal. Vasai. **4)**Shop bearing no.5, Meen Apt., A wing, More, Nalasopara east, Tal. Vasai. **5)** Shop bearing no. 1, Meen Apt., A wing, More, Nalasopara east, Tal.Vasai. **6)** Flat bearing no. B 506, Sai Kiran AB wing society ltd., Tulinj road, Narayan Nagar, nalasopra east, Tal. Vasai. All that the applicant no. 1 have 50 percent share in the said property.
ज्याअर्थी हेअरशिप सर्टीफिकेट मिळण्याकरिता या न्यायालयात चौ.अर्ज क्रमांक १८/२०२४ दाखल केलेला आहे. ज्या कोणी इसमास त्यांचे कायदेशीर वारस, हक्क हितसंबंध किंवा हरकत असेल त्यांनी हया न्यायालयांत दिनांक २२/०२/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता किंवा ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासून एक महिन्याचे आत लेखी हरकत दाखल करावी. सदरहू वारस दाखला देण्याबाबत जर कोणत्याही इसमाची हरकत न आल्यास योग्य ते पुरावे व कागदपत्रे घेऊन अर्जदार हयांना वारस दाखला देण्यात येईल हयाची कृपया नोंद घेण्यात यावी. आज दि. ०२/०२/२०२४ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
(शिक्का) **हुकुमावरुन,**
**अधिक्षक, दिवाणी न्यायालये व स्तर वसई**

**जाहीर सूचना**
याद्वारे सूचना देण्यात येते की, माझे अशील हे बांद्रा, मुंबई उपनगर जिल्ह्याच्या नोंदणीकृत उप-जिल्ह्यामधील गाव: चारकोप, तालुका: बोरिवली च्या सीटीएस क्र. ३ए-२/७६ धारक जमिनीच्या प्लॉटवर बांधकामित रोड क्र. आरएससी-१२/३१, सेक्टर-२, चारकोप, कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०००६७ येथे स्थित प्लॉट क्र. ११, मोजमापित १००.०२ चौ.मीटर्स बिल्टअप क्षेत्र वर बांधकामित बंगल्याचा मालक बनण्यास इच्छुक आहेत. माझे अशील श्री. पंकज अनंतराय किकाणी यांचे नामाधिकार तपासत आहेत आणि त्यानंतर तमाम जनतेकडून आक्षेप आणि दावे मागवित आहेत आणि व्यक्ती ज्यांना वरील सदर फ्लॅटमध्ये कोणताही हक्क, नामाधिकार, हितसंबंध, शेअर आणि दावा किंवा कोणताही भार जसे की, विक्री, भाडेपट्टा, प्रभार, इच्छापत्र, भेट, अदलाबदल, गहाण, धारणाधिकार किंवा कोणत्याही प्रकारचा दावा असल्यास परिणामांसाठी संबंधित कागदपत्रासह त्यांच्या आक्षेपाच्या नोंदी निम्नस्वाक्षरीकारांना या प्रकाशनाच्या तारखेपासून १५(पंधरा) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे. उपरोक्त वेळेत कोणीही कोणतेही आक्षेप न दाखविल्यास, दावा जर असल्यास ते वरीलसदर मिळकतीच्या संदर्भामध्ये त्यागित समजले जातील.
दिनांक: ०६.०२.२०२४
**(वकील राजकुमार चंदनशिवे)**
१०१/ए, श्री टॉवर सीएचएसएल.,
लिंक व्ह्यू हॉटेलच्या वर,
डॉन बास्को हायस्कूल जवळ,
न्यू लिंक रोड, बोरिवली (पश्चिम),
मुंबई-४०००९२.

**जाहीर नोटीस**
तमाम जनतेस हया जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, गांव मौजे वारेट, तालुका भिवंडी, जिल्हा ठाणे येथील सर्वे नं. ५४, हिस्सा नं. २, क्षेत्र हे. आर. चौ. मी ०.१२.५०, आकारणी ०.४०, सर्वे नं. ७४, हिस्सा नं. १०, क्षेत्र हे. आर. चौ. मी. ०.१२.१०, आकारणी ०.१४ हया जमीन मिळकती तसेच सर्वे नं. ५२, हिस्सा नं. १ ब, क्षेत्र हे. आर. चौ. मी. ०.४४,००, आकारणी ०.७६ हया सभोवती भिंतीचे कुंपन असलेल्या जमीन मिळकतीबाबत तिचे मालक नॉबर्ट डॉमणिक वाझ हयाचे बरोबर आमचे अशीलाचे विकत घेण्याबाबत वाटाघाटी चालु आहेत. तरी सदर मिळकतीवर कोणाही इसमाचा, व्यक्तीचा, संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, वापर, कूळ, वहिवाट, अदलाबदल, लीज, वारसा, पोटगी वा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, अधिकार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून १५ दिवसांचे आत लेखी पुराव्यानिशी खालील पत्त्यावर कळवावा, अन्यथा तसा हक्क नाही व असल्यास तो सोडून दिला आहे असे समजून व्यवहार पूर्ण केला जाईल.
**सही/-**
**डेनिस जे. डिमेलो**
**वकिल आणि नोटरी**
पत्ता : " लिली ",वीरा पेट्रोलपंप समोर,
नविन बरामपूर, वसई रोड (प.),
तालुका. वसई, जिल्हा. पालघर, ४०१२०२.

# मुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षाचा आठवा वर्धापन दिन साजरा

**ठाणे** : महाराष्ट्रात आरोग्य व्यवस्थेसाठी आशेचा किरण ठरणाऱ्या मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचा आठवा वर्धापन दिन १५० लहान बाळांच्या शस्त्रक्रिया यशस्वी करून साजरा झाला. सोमवारी ज्युपिटर हॉस्पिटलमध्ये त्यानिमित्ताने कृतज्ञता सोहळाही पार पडला. विविध किचकट आजाराने ग्रस्त असलेल्या पंधरा दिवसांच्या बाळापासून ते शिशु अवस्थेतील उध्या महाराष्ट्रातल्या अनेक लहान बालकांवर अवघड शस्त्रक्रिया करण्याचे मिशन मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष एक मोहीम म्हणून राबवत आहे. यंदाचा त्याचे आठवे वर्ष असून, या टप्प्यात दीडशे शस्त्रक्रिया यशस्वी झाल्यानंतर त्याचा कृतज्ञता सोहळा सोमवारी पार पडला. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून शस्त्रक्रिया झालेली बाळ घेऊन त्यांचे पालक कृतज्ञता व्यक्त करण्यास पोहोचले होते. सकाळी ११ ते तीन वाजेपर्यंत चाललेल्या या सोहळ्यात खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, सांगोल्याचे आमदार शहाजी बापू पाटील, गृहराज्यमंत्री शंभूराजे देसाई, कैलास म्हापदी, ज्येष्ठ पत्रकार संदीप आचार्य, एकनाथ भोईर, राम रेपाले आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. नव महाराष्ट्राच्या आरोग्यवस्थेत गोरगरीबांसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे प्राणवायू असून, हा कक्ष समर्थपणे चालवणारे डॉक्टर श्रीकांत शिंदे आणि मंगेश चिवटे हे देवदूत आहेत, अशा शब्दात उपस्थितांनी या मदत कक्षाचा गौरव केला.

# १५ वर्षांच्या संघर्षानंतर मिळाला कोपरीतील ४७ कुटुंबांना निवारा!

**ठाणे** : बीएसयूपी योजनेमध्ये आवश्यक कागदपत्रे असूनही महापालिकेने अपात्र ठरविलेल्या कोपरीतील ४७ कुटुंबांना अखेर तब्बल १५ वर्षांनंतर निवारा मिळाला आहे. भाजपाचे माजी ज्येष्ठ नगरसेवक भरत चव्हाण व ओमकार चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली रहिवाशांनी घरांसाठीची लढाई जिंकली असून, रेंटल हौसिंगमधील घराची कागदपत्रे नुकतीच मिळाल्यावर त्यांचा आनंद गगनात मावत नव्हता. ठाणे महापालिकेकडून कोपरीतील सिद्धार्थ नगर येथे बीएसयूपी योजना राबविण्यात येत होती. या घरांसाठी रहिवाशांकडून १५ महिन्यांपासून प्रतिक्षा केली जात होती.

**फॉर्म ए**
**जाहीर उद्घोषणा**
(इन्सॉल्व्हन्सी अँड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (इन्सॉल्व्हन्सी रिझॉल्युशन प्रोसेस फॉर कॉर्पोरेट पर्सन्स) रेग्युलेशन्स, २०१६ च्या रेग्युलेशन ६ अन्वये)
**मार्केट लॉजिक सॉफ्टवेअर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड** च्या धनकोंच्या माहीतीकरीता

| संबंधित तपशील | | |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव | **मार्केट लॉजिक सॉफ्टवेअर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड** |
| २ | कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेची तारीख | १९ सप्टेंबर, २०१८ |
| ३ | कॉर्पोरेट कर्जदार ज्या अंतर्गत स्थापित/ नोंदणीकृत आहे ते प्राधिकरण | आरओसी- पुणे |
| ४ | कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट आयडेन्टिटी नंबर/ लिमिटेड लायाबिलिटी आयडेन्टिफिकेशन नंबर | यु७२९००पीएन२०१८एफटीसी१७८८२४ |
| ५ | कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालय व मुख्य कार्यालय (असल्यास) ह्यांचा पत्ता | तळ मजला, युनिट क्र. ४, बी-विंग, व्यवसाय येथे मंत्री, विमान नगर, पुणे, महाराष्ट्र, भारत, ४११०१४ |
| ६ | कॉर्पोरेट कर्जदाराच्या बाबतीत नादारी सुरू होण्याची तारीख | ३ फेब्रुवारी, २०२४ |
| ७ | परिसमापकाचे नाव:<br>परिसमापकाचा पत्ता:<br>परिसमापकाचा ई-मेल पत्ता:<br>प्रक्रिया ई-मेल आयडी:<br>परिसमापकाचा दूरध्वनी क्रमांक:<br>परिसमापकाचा नोंदणी क्रमांक: | श्री. चिराग शाह<br>२०८, रत्नराज स्प्रिंग, नवनिर्माण को-ऑप. बँकेच्या बाजूला, एचडीएफसी बँकेच्या समोर, एचडीएफसी बँक हाऊस, नवरंगपुरा, अहमदाबाद-३८०००९, गुजरात, भारत.<br>chirag.irp@gmail.com<br>mlsindia.vl@gmail.com<br>०७९-४००५१८१०<br>आयबीबीआय/आयपीए-००१/आयपी-पी-०११६९/२०१८-१९/११८३७ |
| ८ | दावे सादर करण्यासाठी अंतिम तारीख | ४ मार्च, २०२४ |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण यांनी **३ फेब्रुवारी, २०२४** रोजीस **मार्केट लॉजिक सॉफ्टवेअर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड** ची एक कॉर्पोरेट नादारी निराकरण प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले.
**मार्केट लॉजिक सॉफ्टवेअर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड** च्या धनकोंना याद्वारे नोंद क्र. ७ समोरील पत्त्यावर अंतरिम निर्णय व्यावसायीकांकडे **४ मार्च, २०२४** रोजी किंवा त्यापूर्वी त्यांच्या दाव्यांचे पुरावे सादर करण्यास सांगण्यांत येते.
वित्तीय धनकोंनी फक्त इलेक्ट्रॉनिक माध्यमातून त्यांच्या दाव्यांचा पुरावा सादर करावा. अन्य सर्व धनको व्यक्तीशः, टपालाने किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पुराव्यासह दावे सादर करू शकतात.
दाव्यांच्या खोटी किंवा दिशाभूल करणारे पुराव्यांच्या सादरीकरण दंडास पात्र असेल.
चिराग राजेंद्रकुमार शाह
परिसमापक
आयबीबीआय/आयपीए-००१/आयपी-पी-०११६९/२०१८-१९/११८३७
एएफए : ०१ नोव्हेंबर, २०२४ पर्यंत वैध
ठिकाण : अहमदाबाद
दिनांक: फेब्रुवारी ५, २०२४

**टेराफॉर्म मॅग्नम लिमिटेड**
नोंद. कार्यालय : गोदरेज कॉलिसीअम, ए विंग, १३०१, १३ वा मजला, एव्हरार्ड नगरमागे, इस्टर्न एक्स्प्रेस हायवेलगत, सायन (पूर्व), मुंबई-४०० ०२२. दूरध्वनी : +९१-(२२)-६२७०४९०० ; सीआयएनः एल६५९९०एमएच१९८२पीएलसी०४०६८४
वेबसाईट : www.terraformmagnum.com ; ई-मेल : secretarial@terraformrealty.com
**३१ डिसेंबर, २०२३ रोजी संपलेल्या तिमाहीकरिता अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांचा उतारा**
(ईपीएस सोडून रु. लाखांत)

| अ. क्र. | तपशील | संपलेली तिमाही | | | संपलेले नऊ महिने | | संपलेले वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ३१.१२.२०२३ | ३०.०९.२०२३ | ३१.१२.२०२२ | ३१.१२.२०२३ | ३१.१२.२०२२ | ३१.०३.२०२३ |
| | | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | लेखापरिक्षित |
| १. | प्रवर्तनातून एकूण उत्पन्न | ०.४९ | ०.१३ | ०.११ | ०.६३ | ७१.१० | ७१.३५ |
| २. | कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर, अपवादात्मक आणि/किंवा अनन्यसाधारण बाबींपूर्वी) | (१.९४) | (२.१४) | (१.११) | (६.२९) | (१८११.५१) | (१८२२.६७) |
| ३. | कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा अनन्यसाधारण बाबींनंतर) | (१.९४) | (२.१४) | (१.११) | (६.२९) | (१८११.५१) | (१८२२.६७) |
| ४. | कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा अनन्यसाधारण बाबींनंतर) | (१.९४) | (२.१४) | (१.११) | (६.२९) | (१८११.५१) | (१८२२.६७) |
| ५. | कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा/(तोटा)(करोत्तर) आणि इतर सर्वसामावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून) | (१.९४) | (२.१४) | (१.११) | (६.२९) | (१८११.५१) | (१८२२.६७) |
| ६. | समभाग भांडवल | २४.०० | २४.०० | २४.०० | २४.०० | २४.०० | २४.०० |
| ७. | पुनर्मूल्यांकित राखीव वगळून इतर इक्विटी (मागील वर्षाच्या ताळेबंदात दाखवल्याप्रमाणे) | ० | ० | ० | ० | ० | (१८३७.६७) |
| ८. | प्रति समभाग प्राप्ती (प्रत्येकी रु. १०/- चे) (अखंडित आणि खंडित कामकाजासाठी) (अवार्षिक) - मुलभूत/सौम्यिकृत ईपीएस | (०.८१) | (०.८९) | (०.४६) | (२.६२) | (७५४.८०) | (७५९.४४) |

**टिपा :**
१. ३१ डिसेंबर, २०२३ रोजी संपलेल्या तिमाही साठीचे वरील निष्कर्ष ०५ फेब्रुवारी, २०२४ रोजी झालेल्या त्यांच्या संबंधित बैठकांमध्ये लेखापरीक्षण समितीने पुनर्विलोकित करून शिफारस केली व कंपनीच्या संचालक मंडळाने त्यास मंजुरी दिली आणि ते वैधानिक लेखापरीक्षकांकडून 'मर्यादित पुनर्विलोकन अहवालाच्या' अधीन होते.
२. कंपनीचे ३१.१२.२०२३ रोजी संपलेल्या तिमाही साठीचे अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष कंपनीची वेबसाईट www.terraformmagnum.com वर उपलब्ध आहेत तसेच बीएसई लि. वर देखील उपलब्ध आहेत.
३. मान्य केलेल्या मोबदल्यात कांदिवली (पूर्व) येथे स्थित व्यापारातील माल म्हणून धारण केलेल्या मिळकतीमधील तिच्या अधिकारांच्या अभिहस्तांकनासाठी २६ एप्रिल, २०१९ दिनांकीत अभिहस्तांकन विलेख कंपनीने केला. अभिहस्तांकितींनी वेळोवेळी वेगवेगळ्या कसुरी केल्या. कंपनीने ताबडतोब सर्व देणी प्रदान करून संविदात्मक दायित्वाचे पालन करण्यासाठी अभिहस्तांकितींवर एक नोटीस बजावली. व्यवहाराच्या पुर्ततेच्या संबंधात महत्त्वाच्या अस्थिरता आणि वाद वर्षादरम्यान चालु असल्यामुळे कंपनी महत्त्वाच्या अस्थिरतेचे निराकरण आणि विशेष कार्यवाही दायित्व पुर्ण झाल्यावर इंड एस ११५ अंतर्गत महसूल म्हणून ओळखला जाणार आहे.
४. वरील विवरणे कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १३३ अंतर्गत विहित कंपनीज (इंडियन अकाउंटिंग स्टँडर्डस्) रुल्स, २०१५ (इंड एएस) ला अनुसरून आणि शक्य होई पर्यंत अन्य मान्यताप्राप्त लेखा पद्धती आणि धोरणे यास अनुसरून बनवली आहेत.
५. आवश्यकतेनुसार मागील कालावधींची आकडेवारी पुनर्गठीत/पुनर्रचित केली आहे जेणे करून चालू कालावधीच्या सादरीकरणाशी सुसंगत होईल.
६. लाखातील आकडेवारी नजिकच्या दशांशात वर्ग केली.
**संचालक मंडळाच्या वतीने आणि करिता**
**टेराफॉर्म मॅग्नम लिमिटेड**
**उर्मी भानूशाली**
**कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी**
**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : ५ फेब्रुवारी, २०२४**

**जाहीर सूचना**
याद्वारे नोटीस दिली जाते की, **श्री. विजय पुरषोत्तम गज्जर** (यापुढे मालक म्हणून संबोधले जाते) विशिष्ट क्रमांक ०८१ ते ०९० (दोन्ही समावेशी) महेश्वर शिखर सहकारी संस्थेने जारी केलेल्या शेअर सर्टिफिकेट क्र.००९ (नऊ) मध्ये, महेश्वर शिखर सहकारी संस्था मुंबई ४०००५४ मधील फ्लॅट क्रमांक २०२ सह समाविष्ट आहेत - (येथे एकत्रितपणे ''सदर प्रिमिसेस'' म्हणून संदर्भित) खाली दिलेल्या अनुसूचीमध्ये स्पष्ट आणि विक्रीयोग्य शीर्षकासह वर्णन केले आहे, सर्व भारांपासून मुक्त आणि रिकामे आणि शांततापूर्ण ताबा सह प्रत्येक ५०/- (पन्नास) च्या त्या सर्व १० (दहा) पूर्ण पेड-अप शेअर्समधील सर्व हक्क, अधिकार आणि हित मालकीच्या आधारावर आमच्या क्लायंटला विकण्यास आणि हस्तांतरित करण्यास सहमती दर्शविली आहे.
कोणतीही व्यक्ती, संस्था, फर्म, संस्था (कॉर्पोरेट किंवा अन्यथा), कोणत्याही स्वरूपाचा कोणताही हक्क, अधिकार, हिस्सा, दावा, स्वारस्य किंवा मागणी असलेल्या किंवा त्या जागेवर किंवा त्याबाबतच्या किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या बाबतीत कोणताही करार, व्यवस्था, विक्री, हस्तांतरण, देवाणघेवाण, असाइनमेंट, भेटवस्तू, ट्रस्ट, देय भाडेपट्टी, पोट-भाडे, भाडेकरार, उप-भाडेपट्टा, संमति आणि परवानगी, वारसा, मृत्युपत्र, उत्तराधिकार, कुटुंब व्यवस्था, धारणाधिकार, शुल्क, गहाण सुलभता, ताबा, देखभाल, व्यवसाय, काळजी घेणारा आधार, सेटलमेंट, प्रलंबित खटला, कोणत्याही न्यायालयाचा हुकूम किंवा आदेश, करार/भागीदारी, कोणतेही लेखन किंवा अन्यथा कोणताही दावा सहाय्यकांसह लिखित स्वरूपात कळवावा अशी विनंती केली जाते. ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत १३३, जहांगीर बिल्डिंग, ३०१, तिसरा मजला, महात्मा गांधी रोड, फ्फ़ोर्ट, मुंबई ४००००१ येथे त्यांचे कार्यालय असल्याचा कागदोपत्री पुरावा, असे न केल्यास, आणि मान्य केले की उक्त जागेवर असा कोणताही हक्क, शीर्षक, हिस्सा, दावा, हित किंवा मागणी अस्तित्वात नाही आणि ते माफ केले गेले आणि/किंवा सोडले गेले आणि/किंवा सोडले गेले आणि/किंवा अस्तित्वात नाही असे मानले जाईल आणि आमच्या ग्राहकांना त्या आधारावर पुढे जाण्याचा अधिकार असेल.
**येथे सांगितलेल्या जागेचे वर्णन - वर संदर्भित**
मुंबई उपनगरातील नोंदणी आणि उप-नोंदणी जिल्ह्यातील गाव - वांद्रे - जी, तालुका अंधेरी चा देरासर लेन (पूर्वी सेंट अँड्र्यू रोड म्हणून ओळखले जाणारे) आणि गुज्जर लेन, सांताक्रूझ (पश्चिम), मुंबई-४०००५४ च्या जंक्शनवर सांताक्रूझ टीपीएस ४ सीटीएस क्र.जी/२३१ च्या अंतिम भूखंड क्रमांक २९ च्या भूखंडावर बांधण्यात आलेले महेश्वर शिखर को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटीच्या मशिखरफ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीतील पहिल्या पोडियम मजल्यावर २ (खालच्या) एका आच्छादित कार पार्किंगच्या जागेसह दुसऱ्या मजल्यावर फ्लॅट क्र. २०२ मापित ७५२.३५ चौरस फूट चटईक्षेत्र आणि सर्व १० (दहा) पूर्ण पेड-अप शेअर्स रु. ५०/- प्रत्येक विशिष्ट न. ०८१ ते ०९० (दोन्ही समावेशी) महेश्वर शिखर को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड द्वारे जारी केलेल्या शेअर सर्टिफिकेट क्र. ००९ मध्ये सर्व अधिकार, शीर्षक, हित आणि मालकी आधारावर वापरण्याचा आणि ताबा घेण्याचा अधिकारासह संलग्न लाभांसह.
दिनांक: ०६.०२.२०२४ **सही/-**
**एसपी आणि सहयोगी**
**वकील आणि कायदेशीर सल्लागार**
१३३, जहांगीर बिल्डिंग, ३०१, ३रा मजला,
महात्मा गांधी रोड, फोर्ट, मुंबई - ४००००१.
ईमेल: shreyas.patel@spandassociates.net

## INFOPARK PROPERTIES LIMITED

CIN : U70109TN2021PLC147646
Regd. Office : Hardy Tower, Ground Floor, Ramanujan Intellion Park, Rajiv Gandhi Salai (OMR), Taramani, Chennai-600113, India
Tel. 91 22 6661 4444, Fax : 91 22 6661 4452, Website : www.tatarealty.in

**Extract of Statement of Standalone Unaudited Financial Results for the quarter and nine months ended 31 December 2023**
**[Regulation 52 (8), read with Regulation 52 (4), of the SEBI (LODR) Regulations, 2015]**

(INR in crores)

| | Particulars | For the quarter ended | For the quarter ended | Year ended |
|---|---|---|---|---|
| | | 31 December 2023 | 31 December 2022 | 31 March 2023 |
| | | (Unaudited) | (Unaudited) | (Audited) |
| | | | (Restated) | (Restated) |
| 1 | Total Income from Operations | 151.81 | 134.28 | 474.50 |
| 2 | Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items) | (46.45) | (69.86) | (252.20) |
| 3 | Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items) | (46.45) | (69.86) | (252.20) |
| 4 | Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and / or Extraordinary items) | (29.52) | (48.95) | (171.15) |
| 5 | Total Comprehensive Income / (Loss) for the period [Comprising (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | - | - | 0.02 |
| 6 | Paid-up equity share capital (Face Value of the equity share INR 10 each) | 74.98 | 75.25 | 74.98 |
| 7 | Reserve (excluding Revaluation Reserves) | (3,510.87) | (3,357.75) | (3,403.83) |
| 8 | Securities Premium Account | 953.55 | 953.25 | 953.55 |
| 9 | Net worth | (2,482.34) | (2,329.25) | (2,375.30) |
| 10 | Paid up Debt capital / Outstanding Debt | 5,680.45 | 5,411.46 | 5,480.62 |
| 11 | Outstanding Redeemable Preference Shares (refer note 3) | NA | NA | NA |
| 12 | Debt Equity ratio (in times) | (2.29) | (2.32) | (2.31) |
| 13 | Earnings per share * (Face value of INR 10/- each) | | | |
| | (a) Basic (INR) | (3.94) | (9.81) | (30.46) |
| | (b) Diluted (INR) | (3.94) | (9.81) | (30.46) |
| 14 | Capital Redemption Reserve | NA | NA | NA |
| 15 | Debenture Redemption Reserve | Refer Note 4 | Refer Note 4 | Refer Note 4 |
| 16 | Debt Service Coverage ratio (in times) | 0.75 | 0.71 | 0.63 |
| 17 | Interest Service Coverage ratio (in times) | 0.95 | 0.79 | 0.80 |
| | * Not annualised for quarters ended 31 December 2023 and 31 December 2022. | | | |

**Notes :**

1 The above is an extract of the detailed format of quarterly / annual financial results filed with the Stock Exchanges under Regulation 52 of the SEBI (LODR) Regulations, 2015. The full format of the quarterly / annual financial results are available on the websites of the Company i.e. www.tatarealty.in and BSE Ltd. i.e. https://www.bseindia.com

2 For other line items of the Regulation 52 (4) of the SEBI (LODR) Regulations, 2015, the pertinent disclosures have been made to the Stock Exchange i.e. BSE Ltd. and can be accessed on the URL- https://www.bseindia.com

3 As the Company has not issued any redeemable preference shares during the quarter / year. Hence, this clause is not applicable.

